अंक ५ : सप्टेंबर २०१२

# समजदार जोडीदार

सेंटर फॉर हेल्थ अँड सोशल जस्टिस - पुणे गावपातळीवरील जनजागृती व खाजगी वितरणासाठी प्रकाशित

**भागीदार संस्था :** युवाग्राम केज
**फॅसिलिटेटर :** निता थोरात, सिंधू जाधव
**प्राथ. आरोग्य केंद्र :** चिंचोली माळी व युसूफवडगांव

`

गाव व गावपातळीवरील कार्यकर्ते

| | प्रेरक | | गावांची नावे |
|---|---|---|---|
| १. | संदीपान घाडगे | - | लाखा |
| २. | चंद्रसेन शिंदे | - | साबला |
| ३. | आबासाहेब कदम | - | धर्माळा |
| ४. | फुलचंद जाधव | - | गांजी |
| ५. | सोनबा राऊत | - | कानडी माळी |
| ६. | राजेसाहेब दातार | - | बेलगाव |
| ७. | विष्णू भुसारे | - | डोणगाव |
| ८. | लक्ष्मण हजारे | - | भोपळा |
| ९. | मनोज गायकवाड | - | हनुमंत पिंपरी |
| १०. | भारत चटप | - | ढाकेफळ |
| ११. | बाबासाहेब बोबडे | - | बोबडेवाडी |
| १२. | रमेश सुर्यवंशी | - | पिसेगाव |
| १३. | विजय जाधव | - | केवड |
| १४. | चंद्रकांत माने | - | तरनळी |
| १५. | शंकर इतापे | - | आरणगाव |
| १६. | अतुल देशमुख | - | माळेगाव |
| १७. | व्यंकट जाधव | - | जाधव जवळा |
| १८. | गणेश सोनवणे | - | सारणी |
| १९. | राम थोरात | - | कुंबेफळ |
| २०. | रामेश्वर घुले | - | केळगाव |



## यशोगाथा

**ॲनिमेटर :** संगिता बसवराज बामणे सरपंच, चपळगाववाडी, ता. अक्कलकोट, जि. सोलापुर
**संस्था :** हॅलो मेडिकल फाऊंडेशन, अणदुर

नमस्कार..

मी संगिता बसवराज बामणे, दीड वर्षापुर्वी ओ.बी.सी. प्रवर्गातून निवडून आले होते पण दुस-या प्रवर्गातील एका महिलेने ओ.बी.सी. प्रवर्गाचे खोटे प्रमाणपत्र निवडणुक आयोगाला देऊन निवडणुकीनंतर ती महिला गावची बेकायदेशिर सरपंच बनली व तिला स्थानिक राजकारण्यांचा मोठा पाठींबा होता.

त्यानंतर मी जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार केली पण निकाल माझ्या विरोधात गेला त्यानंतर मी हायकोर्टात तक्रार दाखल केली. मध्यंतरीच्या काळात मला धमक्या पण येत होत्या व एकदा तर जड वाहनाखाली चिरडण्याचा पण प्रयत्न झाला होता.

या सर्व प्रक्रीयेमध्ये माझ्या गावातील ॲनिमेटर - गौरीशंकर दोड्डाळे आणि हसापुर चे ॲनिमेटर नवनाथ चव्हाण यांनी मला खूप आधार दिला. या दोघांनी मला अन्याया विरूध्द लढण्यासाठी प्रेरीत केले. गावकरी मला आणि माझ्या कुटुंबाला टोमणे मारत होते. मला मुंबई च्या हायकोर्टात न्याय मिळाला. आता मी ग्रामपंचायत मिटींगला उपस्थित राहून निर्णय घेत आहे. तसेच ग्रामपंचायतीच्या इतिहासामध्ये पहिल्यांदा महिलांची ग्रामसभा १४ ऑगस्ट २०१२ रोजी आयोजित केली होती. १ मे, महाराष्ट्र दिनाच्या आदल्या दिवशी महिलांची ग्रामसभा आयोजित करण्याचा प्रयत्न केला. पण तो अयशस्वी ठरला. पण १४ ऑगस्ट ला ग्रामसभा आयोजित करण्यासाठी गौरीशंकर दोड्डाळे व नवनाथ चव्हाण यांनी प्रेरणा दिली व आरोग्य विषयक प्रश्नांबाबत या ग्रामसभेत चर्चा करण्यात

**अरे संसार संसार, लग्नाची घाई फार, उमलू द्या जाई जुई, करा पोरीचा विचार**

आली गौरीशंकर व नवनाथ यांनी मला एन.आर.एच.एम., व्ही.एच.एस.सी. व त्याचा अबाधित निधी कसा वापरला / वापरता येतो याविषयी सांगितले. अंगणवाडी ताईने व्ही. एच.एस.सी मधुन रूपये ५०००/- ची मागणी, टेबल आणि खुर्च्या विकत घेण्यासाठी केली होती. मी पैसे द्यायला नकार दिला आणि हा निधी अशा गोष्टीसाठी नाही तर आरोग्य आणि आहार याच्यासाठी आहे असे तिला सांगितले.

जर गौरीशंकर व नवनाथ ने मला जाणिव करून दिली नसती तर मी खुर्च्या व टेबल घेण्यासाठी अंगणवाडी ताईला सही दिली असती.

---

**गाव :** वायबटवाडी ता.जि. बीड

**ॲनिमेटर :** व्यंकट निर्धार

**संस्था :** सावित्रीबाई फुले महिला मंडळ, बीड

वायबटवाडी या गावामध्ये एक महिन्यात घडलेली घटना, एक विवाहित पुरुष दारू पिऊन तो आपल्या पत्नीला मारहाण करत होता. त्यावेळेस गावातील काही व्यक्ती त्यांना पाहात होते. तर काही जण त्या पुरूषाला धरण्यास सहभागी होते.

मी व गटातील ८-१२ सदस्य स्वतः जाऊन त्या पुरुषास धरून तिला मारण्याचं थांबवलं व समजाऊन सांगितलं की, अरे बाबा दारू पिणं चांगलं नाही किंवा पत्नीला मारणं वाईट आहे. दारू पिल्यावर तुझा संसार उध्वस्त होऊ शकतो किंवा तु दारू पिऊन रोज जर असेच करत असेल तर दारूमुळे तुझ्या कुटुंबाचा सगळा सत्यानाश होऊ शकतो.

आम्ही जेव्हा त्या जोडप्यांचे भांडण सोडवत होतो, त्यावेळेस त्या स्त्रीचा पती म्हणाला 'हा आमचा घरगुती मामला आहे' त्यावेळेस आम्ही त्याला समजुन सांगितले की, तुझ्या लग्नाला साक्षीदार आम्ही होतो. तुझ्या सुख - दुःखात आम्ही असतो मग हयाच भांडणात आमचा सहभाग का नसावा ?

मग त्याला आमचे म्हणणे पटले व त्याने भांडण बंद केले व आता तो व्यवस्थित राहात आहे. त्याचा संसार चांगल्या पध्दतीने चालला आहे.

---

**संस्था -** अस्तित्व ट्रस्ट, सांगोला

**फॅसिलिटेटर्स –** विजय धनवडे, सुनिता धनवडे
भैरू डोरले

प्राथमिक आरोग्य केंद्र, कोळे अंतर्गत व समजदार जोडीदार प्रकल्पामधील हे एक गाव आहे या गावामध्ये आरोग्य उपकेंद्र आहे. या उपकेंद्रामध्ये २ ए.एन.एम. ची नियुक्ती आहे. तसेच एक एम.पी.डब्लू. व एक अर्धवेळ महिला परिचारीका आहे. ४ महिन्यांपुर्वी येथे २ ए.एन.एम. नवीन रूजू झाल्या आणि त्यांनी उपकेंद्र पाहीले असता ते राहण्यास योग्य नव्हते असे त्यांच्या लक्षात आले. कंपाऊंड नाही, पाण्याची सोय नाही, लाईट ची सोय व्यवस्थित नाही, अस्वच्छ परिसर असे वातावरण होते. त्यांनी पी.एच.सी. डॉक्टरांना सांगितले की, आम्ही दुस-या जवळच्या गावी राहुन आम्ही ये - जा करतो. परिस्थितीचा विचार करून डॉक्टरांनी त्यांना बाहेरगावी राहण्यास परवानगी दिली.

ए.एन.एम. दररोज गावात येऊ लागल्या, त्यांच्यासोबत गावातील अर्धवेळ असणारी परिचर त्यांना घेऊन गावातून वाडया - वस्तीतुन फिरू लागल्या. गावातील ठरावीक मुलांच्या लक्षात आले की, दोन्ही ए.एन.एम बिगर लग्नाच्या आहेत. थोडया दिवसात आम्ही त्यांची भेट घेतली व आम्ही 'समजदार जोडीदार' प्रकल्पामध्ये काम करतो व आमचे काम गावासोबत, गटासोबत आणि पी.एच.सी सोबत आहे असे सांगितले व आपणांस गावात काही अडचण असल्यास सांगण्याची विनंती केली. त्यावेळी त्यांनी उपकेंद्रातील गैरसोयीबाबत सांगितले, पाण्याची सोय नाही, परीसर अस्वच्छ, लाईटची सोय नाही, कंपाऊंड नाही इ. त्यावेळी आम्ही दोघांनी त्यांना सांगितले की, सरपंच, उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य यांना आम्ही वैयक्तिक बोलु तसेच गटसदस्यांना पण बोलू.

त्यानंतर आम्ही गावातील प्रतिष्ठित व्यक्ती तसेच सरपंच, उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य व गट सदस्य व आम्ही दोघे असे मिळून उपकेंद्राबाबत चर्चा केली व त्यांनी पाण्याची सोय करून दिली. तसेच ग्रामपंचायतच्या शिपायाला सांगून स्वच्छता केली, लाईटची सोय केली. त्यानंतर आतील स्वच्छता करून दोन्ही ए.एन.एम.राहण्यास उपकेंद्रामध्ये आल्या.

उपकेंद्रामध्ये ए.एन.एम राहण्यास आल्या. पण गावातील टवाळखोर मुले सारखी उपकेंद्रामध्ये फिरू लागली. तसेच काही जण तर अंधार झाला की उपकेंद्रामध्ये जाऊन निरोध ची मागणी करू लागली, ही गोष्ट त्या दोघी पण कुणाजवळ बोलू शकत नव्हत्या. शेवटी आठ ते दहा दिवसानंतर ॲनिमेटर व फॅसिलिटेर भेटण्यास गेल्यानंतर उपकेंद्राच्या सुविधाबाबत चर्चा केली. आता सोयी - सुविधा चांगल्या आहे, पण ... असे म्हणून गप्प झाल्या. त्यांना बोलता येईना पण शेवटी आमच्या मनात पाल चुकचुकली व आम्ही जातो म्हणून निघुन आलो. आम्ही बाहेर आल्यानंतर असा विचार केला

**स्त्रियांच्या हक्कांचा आदर करणा-या पुरूषांचा आम्ही आदर करतो.**

की, आपण अर्धवेळ असलेल्या परिचर तिच्या नव-याशी चर्चा करू. आम्ही त्यांच्याची चहा पिण्याच्या निमित्ताने चर्चा केली त्यांना माहीत होते आम्ही पी.एच.सी. सोबत काम करतो. आम्ही त्यांना म्हणालो कि, ए.एन.एम यांना आता काय त्रास आहे का? ते म्हणाले माझ्या कानावरती तरी अजून नाही. शेवटी आम्ही त्यांना सांगितले की सायंकाळी तुम्ही तुमच्या पत्नीला थोडे विचारून बघा व काय त्रास असेल तर आपण सर्वजण मिळून सोडविण्याचा प्रयत्न करू.

दुस-या दिवशी आम्ही त्यांची भेट घेतली व विचारले रात्री तुमच्या पत्नीसोबत काय चर्चा केली. त्यावेळी त्यांनी सांगितले की ३-४ टार्गट मुले रात्रीचे उपकेंद्रात जातात व निरोध मागतात. व दोन्ही ए.एन.एम. अविवाहित असल्याने गावातील मुले त्रास देतात. त्यावेळी आम्ही असे ठरवले की, सायंकाळी उपकेंद्रापासून कोण - कोण सारखे ये - जा करतोय ते बघुन दुस-या दिवशी त्याला समजावुन सांगायचे असे ठरले. आम्ही ३ बाजूला तिघेजण उभे राहून पाहीले असता दररोज घडणारा प्रकार आम्हाला दिसला. आम्ही दुस-या दिवशी त्या मुलांना वैयक्तिक भेटून समजाऊन सांगण्याचा प्रयत्न केला, पण ते काहीही केल्याने ऐकण्यास तयार नव्हते व ते म्हणाले ते त्यांचे काम आहे. गावाला सेवा देण्यासाठी त्या येथे आहेत. त्यानंतर आम्ही त्यांना समजाऊन, सांगितले, तुम्ही त्रास दिला तर त्या गावात राहणार नाहीत व सेवा मिळणार नाहीत व यापुढे तुम्ही त्रास दिला तर आम्ही आमच्या गटांच्या वतीने तुमच्यावर काहीतरी कार्यवाही करू, शेवटी त्यांनी मान्य केले व आजतागायत कामाशिवाय कोणीही उपकेंद्राजवळ फिरकत नाही व त्या दोन्ही ए.एन.एम. ला होणारा त्रास कमी झाला व त्यांनी ॲनिमेटरचे आभार मानले.

**गाव :** वर्वे बु. ता. भोर, जि. पुणे

**ॲनिमेटर :** मोहन केदारे

**संस्था :** नारी समता मंच, पुणे

नमस्कार

मी मोहन केदारे, नारी समता मंच, पुणे या संस्थेमध्ये समजदार जोडीदार या प्रकल्पामध्ये ॲनिमेटर म्हणून काम करत आहे. मला एक मुलगा, एक मुलगी आणि पत्नी असा परीवार आहे. माझ्या मुलीचे लग्न झाले आहे तिचे १२ वी पर्यंत शिक्षण झाले आहे. सासरी गेल्यावर सासरच्या लोकांनी तिचे डी.एड. व बी.ए. चे शिक्षण पुर्ण केले आहे. मुलाचे डिप्लोमा मेकॅनिक इंजिनिअरचे शिक्षण पुर्ण झाले आहे.

या प्रकल्पात आल्यानंतर प्रशिक्षण, मासिक बैठकांद्वारे महिलांवर होणारी हिंसा, जेंडर, स्त्री - पुरूष समानता व यात पुरूषाची भूमिका, महिलांचे प्रजनन आरोग्य इ. विषयांवर सखोल माहिती मिळाली. त्यामुळे माझ्या विचारात व वागणुकीत बदल झाला आहे. गावात विवाहित व अविवाहित सदस्यांचे दोन गट बनवले आहेत. पुर्वी गटांच्या मिटींग घेताना अविवाहित गट सदस्यांना संकोच वाटत होता. पुढे हळुहळु दोन्ही गटातील सदस्यांना मिटींगची आवड निर्माण झाली. आता ते स्वतःहून विचारतात की मिटींग कधी घ्यायची.

पुर्वी मी घरकामात पत्नीला मदत करत नव्हतो, पण प्रकल्पात काम करत असताना मिळणा-या प्रशिक्षणामुळे मला खुप माहीती मिळाली. पत्नी आजारी असल्यानंतर पण मी खूप काळजी घेतो. तसेच घरकामात मदत पण करू लागलो. आता मी चहा, मसाले भात चांगला बनवू लागलो आहे. पत्नीला घरकामात मदत करू लागल्यामुळे पत्नी खूष आहे व ती अंगणवाडी सेविका असल्यामुळे संस्थेच्या कामात मला मदत करत आहे. किशोरवयीन मुली व महिलांना एकत्र आणण्यात पत्नीचे मला खुप सहकार्य मिळत आहे. तसेच दोन्ही गटांच्या मिटींगला फॅसिलिटेटर येऊन चांगल्या प्रकारे मार्गदर्शन करत आहेत. त्यामुळे गट सदस्य मिटींगला येत आहेत.

**गाव :** हनुमंत पिंपरी, ता. केज

**ॲनिमेटर :** गायकवाड मनोज उत्तरेश्वर

**संस्था :** युवाग्राम संस्था, केज

मी गावामध्ये काम करताना मला सुरूवातीला आरोग्याविषयी सेवा सुविधा काय आहेत हे माहीत नव्हते, परंतू मला समजदार जोडीदार प्रकल्पामध्ये आल्यानंतर आरोग्याविषयी सेवा सुविधा, महिलांवर होणा-या हिंसा, छेडछाड बद्दल माहिती झाली.

आरोग्याविषयी माहिती झाल्यामुळे आमच्या गावात प्राथमिक आरोग्य उपकेंद्र आहे. परंतू मी गावात गेलो असता मला एका महिलेने सांगितले की मी पाच दिवस जुलाबाची गोळी आणण्यासाठी जाते, परंतू मिळत नाही आणि तुम्ही गावातले मुलं काय करता, हे मी ऐकल्यावर मी स्वतः मला हवी नसताना गटातील १० सदस्यांना घेऊन गोळी मागितली तर मला त्या मॅडमने गोळी नाही असे सांगितले. पण मी त्यांना विचारले किती दिवसापासून गोळया नाहीत, तर त्यांनी सांगितले की २ दिवसांपासून गोळया नाहीत परंतू मी ती

**भेदभाव संपवा, समानतेचे सूत्र धरा....**

महिला बोलावली व विचारले की तुम्ही किती दिवसांनी मागता त्यांनी सांगितले ५ दिवसाने. त्या वेळेस आम्ही १० गटातील सदस्यांनी त्यांना तुम्ही तुमच्या निधीतून गोळया आणा आणि वाटा हे सांगितले व त्यांनी दुस-या दिवशी गोळया आणून वाटल्या, हे आम्ही गटाच्या माध्यमातुन काम केले व ते यशस्वी झाले.

मी स्वतः ॲनिमेटर म्हणून मी  एम.पी.डब्लू यांना गावातील तीन विंधन विहीरीचे पाणी परीक्षणासाठी दिले व त्यांनी परीक्षणाला पाठविले आहे.

---

**गाव :** जुजारपूर
**ॲनिमेटर :** पवन गाडे
**संस्था :** अस्तित्व संस्था, सांगोला

मी पवन गाडे, जुजारपूर गावात ॲनिमेटर म्हणून काम करत आहे प्रकल्पापुर्वी मला समानता ही कोणत्या प्रकारे असावी व हिंसेविषयी मला काहीही माहीत नव्हते सध्या मी माझ्या घरामध्ये आईला स्वयंपाकात व इतर कामामध्ये मदत करतो. यापुर्वी माझा समज असा होता की महिलांचे काम महिलांनीच करावे. पण या प्रकल्पात काम करायला लागल्यापासून मी घरकामात मदत करतो. माझ्या घरामध्ये दोन्ही भावांच्या पत्नींचा मी आदर करतो. मी पुर्वी कधी - कधी लहान मुलांना व मित्रांना शिवी द्यायचो पण शिवी देणे ही हिंसा आहे हे पुर्णपणे लक्षात आल्यापासून मी शिवी देत नाही. माझी आई भावाची पत्नी या सार्वजनिक कार्यक्रमात सहभागी होत नव्हत्या सध्या ग्रामसभेसाठी व इतर कोणत्याही कारणास्तव त्यांचा हिंडण्या फिरण्याचा वावर वाढलेला आहे.

मी स्वतः माझ्या कुटुंबातील महिलांचा मान राखतो. स्त्री पुरूष समानतेच्या दृष्टीकोनातून महिलांना संधी मिळावी, या दृष्टीने प्रयत्न करतो. माझ्याकडे गावातील प्रतिष्ठित व्यक्तींचा बघण्याचा दृष्टीकोन यापुर्वी वेगळा होता. पण सध्या 'स्त्री - पुरूष समानतेचा ॲनिमेटर म्हणून काम करणारा व्यक्ती ' म्हणून माझी ओळख झालेली आहे.

माझ्या कुटुंबातील व गावातील इतर व्यक्तींच्या बाबतीत महिलांच्या आरोग्याची काळजी घेणे, घरकामात मदत करणे, मुलगा - मुलगी भेदभाव न करणे, पंचायतराजमध्ये महिलांचा सहभाग वाढवणे याविषयी माझ्यात पुर्ण बदल झालेला आहे. सध्या मी वरील विषयाप्रमाणे समानता या दृष्टीकोनातून विचार करण्याचा व कृती करण्याचा मानस केला आहे.


पुणे येथे ॲनीमेटरचे प्रशिक्षण


सांगोला येथे तालुका पातळीवरील जनसंवाद


बागलवाडी येथे गटसदस्य सापशिडी चा खेळ खेळतांना


पोस्टर प्रदर्शन चपलगाववाडी


हटकर मंगेवाडी येथे गट बैठक

**अरे संसार संसार, एकमेकांचा विचार, आनंदाने भरे घर, होई सुखाचा संसार**